# ज्ञान प्रबोधिनी, अंबाजोगाई

## वार्षिक वृत्त 2024-2025

### नियमित उपक्रम

दरवर्षीप्रमाणे वर्षारंभ, भजन संध्या, अभिव्यक्ती, छात्र प्रबोधन दिवाळी अंक नोंदणी, नवरात्र महोत्सव, सामूहिक दिवाळी, स्वामी विवेकानंद जयंती उत्सव, वर्षांत उपासना हे नियमित कार्यक्रम घेण्यात आले.

| अनु.क्र. | नियमित उपक्रम | दिनांक | प्रबोधक संख्या | सहभाग |
|---|---|---|---|---|
| 1) | आषाढी एकादशी | 17/07/2024 | 52 | शिशुविहार |
| 2) | भजन संध्या | 28/07/2024 | 63 | 5 गटांचे सादरीकरण |
| 3) | वर्षारंभ उपासना | 18/08/2024 | 31 | कार्यकर्त्यांची उपस्थिती |
| 4) | सामुहिक दिवाळी | 26/10/2024 | 45 | पालक,कार्यकर्ते उपस्थिती |
| 5) | विवेकानंद जयंती | 12/01/2025 | 26 | युवती गट,कार्यकर्ते |
| 6) | अभिव्यक्ती | 09/02/2025 | - | पालक,विद्यार्थी,कार्यकर्ते |
| 7) | वर्षांत उपासना | 06/04/2025 | 21 | कार्यकर्ते |

### विशेष कार्य

### *वस्ती कार्य

*नवीन शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यार्थ्यांनी शाळेत जावे यासाठीचे प्रयत्न वस्तीवरील कार्यात प्रामुख्याने करण्यात आले. या कामातून शिक्षणाची आवड निर्माण होऊन

वस्तीवरील पाच वर्षांच्या कामानंतर गणेश सवादे हा 78 गुण घेऊन नववी परीक्षा उत्तीर्ण झाला. तर केवळ जिद्दीच्या जोरावर सुनीताने थेट पाचवीत प्रवेश घेऊन देखील दहावीची परीक्षा उत्तीर्ण केली. वस्तीवरील अनेकांच्या आधार कार्ड तयार करून घेण्याचे प्रमुख कार्य या वर्षात झाले. वस्तीवरील मुलांमधील आत्मविश्वास वाढीस लागला. मुले व प्रबोधिनी यांच्यात एक बंध निर्माण झाला. अभ्यासात संदर्भात मुलांना मार्गदर्शन करण्यात आले.



## *शिशुविहार

*यावर्षी आपण शिशुविहारमध्ये तीन वर्षाचा वेगळा किलबिल गट सुरू केला. यातील विद्यार्थी व पालक यांचा वेगळा उत्साह पाहायला मिळाला. तसेच विद्यार्थ्यांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा घेण्यात आली. शिशुगटामार्फत दिनांक 1 मार्च रोजी बाल शिक्षण परिषद घेण्यात आली. या बालशिक्षण परिषदेमध्ये 35 महिला शिक्षकांची उपस्थिती होती हे विशेष. अशा प्रकारची बालशिक्षण परिषद प्रथमच या ठिकाणी झाली. याचा वेगळा परिणाम जाणवला. शिशुविहार मध्ये नियमित उपक्रम तर घेण्यात आलेच त्यासोबत पंचकोशाधारित शिक्षणावर वेगळा प्रयोग करण्यात आला. मयूर गट, चिमणी गट, किलबिल गट या तीन गटावर वेगवेगळे प्रयोग करण्यात आले. रंगांची ओळख, क्रांतिकारकांची ओळख, संत परंपरेची ओळख, आपल्या सण समारंभाची ओळख, प्राण्यांविषयी माहिती, प्रभात फेरी, मयूर गटाच्या विद्यार्थ्यांसाठी भाषण स्पर्धा, इतर गटातील विद्यार्थ्यांसाठी अभिव्यक्ती अशा विविध

उपक्रमातून विद्यार्थ्यांसाठी काम झाले. पंचकोषाधारीत शिक्षण ही प्रक्रिया समजून घेण्यासाठी निगडी येथील राम दादा यांनी ऑनलाईन पद्धतीने मार्गदर्शन केले.विषय मांडणी व प्रश्नोत्तरे असे या सत्राचे स्वरूप होते.

**ज्ञानप्रबोधिनीची 25 वर्ष**

***ज्ञानप्रबोधिनी अंबाजोगाई केंद्राला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहे. 1999 साली सुरू झालेल्या शिशुशाळेचा प्रयोग आजही दिमाखात चालू आहे. या पंचवीस वर्षाच्या निमित्ताने अभिव्यक्ती २०२५ या कार्यक्रमात 25 वर्षात शिशु शाळेत अध्यापन कार्य केलेल्या अध्यापाकांचा यथोचित सन्मान करण्यात आला.**

***यासोबत 25 वर्षाच्या कार्याबद्दल गणेश उत्सवा दरम्यान प्रसाद दादा यांची मुलाखत घेण्यात आली.**



## *गणेशोत्सव

*यावर्षीचे गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे यावर्षी पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करण्यात आला. गणेशाची मूर्ती देखील कागदापासून बनवण्यात आली. या गणेशमूर्ती निर्मितीमध्ये अंबाजोगाईतील श्री गणेश कदम यांनी सहकार्य केले. युवती गटातील काही विद्यार्थ्यांनी त्यांना मदत केली. सजावट करतानाही पर्यावरणाचा विचार करून सजावट करण्यात आली.पालक गटाचे विशेष सहकार्य लाभले.पालकांचा वेगळा गट उभा झाला. गणेश उत्सवांतर्गत विक्री उपक्रम देखील

घेण्यात आला. ज्ञानप्रबोधिनीला 25 वर्ष पूर्ण होत आहेत त्याकरिता प्रसाद दादा यांची मुलाखत घेण्यात आली. ज्ञान प्रबोधिनीच्या शिशुविहारच्या ताई श्रीमती रोहिणी राखे या गणेशोत्सवाच्या अध्यक्ष होत्या.






गणेश उत्सवा दरम्यान मातृभूमी पूजनाचे आयोजन करण्यात आले. दैनंदिन जीवनातील पर्यावरण या विषयावर डॉक्टर सुभदा लोहिया यांचे व्याख्यान झाले. गणेश उत्सवात ढोल ताशा स्पर्धेमध्ये युवती गटाच्या पथकाला विशेष अकरा हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. युवती गटाच्या लेझीम पथकाला देखील 11000 रुपयांचे पारितोषक मिळाले. यासोबत गणेश विसर्जन मिरवणुकीत 11 हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक व आरास देखावा स्पर्धेत तीन हजार रुपयांचे उत्तेजनार्थ पारितोषिक असे एकूण 36 हजार रुपयांची बक्षीस रक्कम ज्ञानप्रबोधिनीच्या गणेश मंडळाने जिंकली. जवळपास 50 विद्यार्थ्यांचे बरची पथक व वीस ते पंचवीस मुलींचे ढोल पथक बसवण्यात आले.





## *निवेदिता गट

*निवेदिता गटामार्फत प्लास्टिक रिसायकलिंगचे काम जोरदार चालू आहे. वेगवेगळ्या शाळांमधून प्लास्टिक गोळा करून घेतले जाते. यावर्षीच्या वेगळ्या उपक्रमात त्यांनी कुटुंबाला देखील समाविष्ट करून घेतले. वैयक्तिक कुटुंबाची व शाळांची वेगवेगळी स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेमुळे प्लास्टिक मोठ्या प्रमाणात जमू लागले. स्पर्धेचे बक्षीस वितरणही जोरदार करण्यात आले. यासाठी नगरपरिषद अंबाजोगाई यांचे सहकार्य लाभत आहे. निवेदिता गटाच्या मार्फत आणखी एक वेगळा कार्यक्रम या वर्षभरात घेण्यात आला. तो म्हणजे ओळख स्पर्शाची हा उपक्रम निवेदिता गटाच्या सदस्या वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन ओळख स्पर्शाची जाणीव जागृतीची या विषयावर कार्यशाळा घेतल्या. खोलेश्वर माध्यमिक विद्यालय, खोलेश्वर प्राथमिक विद्यालय, लोकमान्य विद्यालय पोखरी, अशा शाळांमधून या कार्यशाळा संपन्न झाल्या.

## *गट उभारणी

*गट उभारणीमध्ये अभिव्यक्ती सादरीकरणात पालकांचे गट मोठ्या उत्साहाने सहभागी झाले. तसेच पालकांच्या शिबिरामधून पालक ज्ञानप्रबोधिनीशी जोडल्या गेले. भजन संधीच्या कार्यक्रमात देखील पालकांचा गट सहभागी झाला. गणेश उत्सवात पालक गटाच्या सदस्यांनी युवती गटाला खूप सहकार्य केले.



## *छात्र प्रबोधन

*छात्र प्रबोधन नोंदणी मध्ये जवळपास 14 शाळांशी संपर्क झाला. यातून 505 मराठी अंक,103 इंग्रजी अंक, 221 ग्रामीण अंक व 241 दिनदर्शिका वितरित करण्यात आल्या.असे एकूण 1070 अंक वितरीत करण्यात आला. स्वामी विवेकानंद बाल विद्यामंदिर व बालनिकेतन या शाळांमध्ये छात्र प्रबोधन वाचक मेळावा घेण्यात आला. दि.२७-१०-२०२४ रोजी छात्रप्रबोधन दिवाळी अंकाचा प्रकाशन सोहळा व दिपोत्सव पार पडला. प्रकाशन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. उद्धव शिंदे उपस्थित होते. त्यांनी वाचनाचे महत्त्व युवती गटातील मुलींना सांगितले.

या कार्यक्रमात युवती विभागाने भरतनाट्यम, दिवाळी गीतांचे सादरीकरण केले.तसेच दिवाळी अंक नोंदणी करताना आलेल्या अनुभवाचे कथन मुलींनी केले.व विविध प्रकारच्या रांगोळीचे प्रदर्शन या कार्यक्रमात करण्यात आले.



## *युवती गट

*युवती गटामार्फत वर्षभरात अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मुलींसाठी शिबिरे, पालक गटासाठी एक दिवसीय शिबिर, नवरात्र उत्सव, भगिनी निवेदिता जयंती निमित्त व्याख्यान, तिसरी ते नववीच्या मुलींसाठी पुस्तक मुलांच्या हाती हा साप्ताहिक उपक्रम, आधुनिक नवरात्रात वेगवेगळ्या विषयावर वाचन सत्र, मराठी दिनानिमित्त महिलांसाठी कार्यक्रम, भित्तिपत्रक स्पर्धा अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. यातून पालकांचे गट बांधणी चांगल्या प्रकारे झाली. वेगळा उपक्रम २९-१२-२०२४ इयत्ता ३ री ते ९ वी च्या मुलींसाठी " पुस्तक मुलींच्या हाती " या साप्ताहिक उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. या उपक्रमांतर्गत मुली रविवारच्या

साप्ताहिक बैठकीदरम्यान वाचनासाठी पुस्तक घेऊन जातात व पुढच्या साप्ताहिक बैठकीत वाचलेल्या पुस्तकाबद्दल माहिती लिहून आणतात व ती माहिती सर्व मुलींना वाचून दाखवतात.



